ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

# पाचव्या औद्योगिक युगाच्या परिप्रेक्ष्यात शैक्षणिक शाश्वत विकास उद्दिष्टांच्या संस्थात्मकीकरण्याची भूमिका

*** डॉ. नितीन रणदिवे व **प्रा. विजया विठ्ठल लोखंडे**

* सहा. प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र.

**सहा. प्राध्यापक, श्रीमती पुतळाबेन शहा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगली.

**प्रस्तावना:**

*मानवी समाज व्यवस्थेमध्ये शिक्षण हा घटक महत्त्वाचा मानला गेला आहे. कुणी तो स्वतःसाठी स्वयंघोषित मर्यादित ठेवला तर कोणी समाज व्यवस्था परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षण दुसऱ्यांना देण्याची बाब मानून समाज शहाणा करण्याचे वृत्त हाती घेतले होते.त्यामुळे प्राचीन काळापासून शिक्षण देणारी व्यवस्था एक आणि शिक्षण नाकारणारी व्यवस्था असे दोन मतप्रवाह संविधानिक लोकशाही अस्तित्वात येण्यापर्यंत अस्तित्वात होते असेच म्हणावे लागेल. मात्र भारतीय राज्यघटनेने शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून मानवाला बहाल केला.... एवढे अनर्थ एका अविद्याने केले असे सांगणारे महात्मा फुले दापंत्य व मुलांना शिक्षणासाठी शाळेत पाठवा नाहीतर एक रुपया दंड भरा असा वटहुकूम लोकराजा छत्रपती शाहू महाराज व शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा हा संदेश देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तसेच स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद हे घोष वाक्य घेऊन सर्वसामान्यांच्या झोपडीपर्यंत ज्ञानाचा दिवा लावणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचारांचा सिद्धांतिक पाया हाच खरा शैक्षणिक प्रणालीतील शाश्वत विकास उद्दिष्टांच्या संस्थात्मकीकरण्याचा ढाचा होता. हा पाया मुळातच लोकवर्गणीतून पुढे आलेला होता व बहुजन शिक्षणाचा वसा आणि वारसा घेतलेल्या उद्योग धुरीणांच्या सहकार्याचा आधार होता. यातूनच शैक्षणिक विचारांचा प्रचार आणि प्रसार हा मुळातच सामाजिक बदलासाठी समाज उन्नतीसाठी झाला. यामध्ये उद्योगधूरीणानी सहकार्य हाच मुख्य हेतू कायमस्वरूपी ठेवला म्हणूनच औद्योगिक प्रणालीमध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांच्या संस्थात्मकी करणाला बळ मिळाले.*

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

तथापि बदलत्या माहिती तंत्रज्ञानामुळे व औद्योगिकीकरणामुळे शिक्षणामध्ये बदलाची सीमा सामाजिक बदल, समाज परिवर्तन यांच्यासाठी ज्ञान होण्यापेक्षा तंत्रज्ञान हे शिक्षणासाठी उत्तम साधन मानण्यात येऊ लागले व त्याला औद्योगिक क्रांतीचे युग कारणीभूत ठरू लागले व शिक्षणामध्ये तांत्रिक औद्योगीकरणाच्या सहभागामुळे शैक्षणिक प्रणालीतील शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाचे संस्थात्मकीकरण होताना अडथळे निर्माण होतात. याच अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'पाचव्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

औद्योगिक युगाच्या परिप्रेक्ष्यात शैक्षणिक शाश्वत विकास उद्दिष्टांच्या संस्थात्मकीकरण्याची भूमिका' यावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) बदलत्या माहिती तंत्रज्ञानामुळे व औद्योगिकीकरणांमध्ये होणारे बदल निश्चितच परिवर्तनवादी व विकासवादी असले तरी शिक्षणातून 'माणूस' म्हणून घडण्याची भूमिका बजावण्याच्या अनुषंगाने पाचव्या औद्योगिक युगाचा अभ्यास करणे.
2) शैक्षणिक शाश्वत विकास उद्दिष्टांच्या संस्थात्म कीकरणासाठी फुले -शाहू -आंबेडकर यांचा शैक्षणिक विचारांचा सिद्धांतिक पाया महत्त्वाचा आहे या अनुषंगाने अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** या शोधनिबंधासाठी आशय विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी दुय्यम साधने वापरण्यात आलेली आहेत. संकलित केलेल्या माहितीचा योग्य स्रोत पुस्तके, जर्नल्स, मासिके,ग्रंथ तसेच ऑनलाईन जर्नल्सची वेबसाईट इत्यादी स्रोत वापरण्यात आलेले आहेत.

**संशोधन उद्दिष्टांचा सविस्तर आढावा:**

1) **बदलत्या माहिती तंत्रज्ञान व औद्योगिकीकरणांमध्ये होणारे बदल निश्चितच परिवर्तनवादी व विकासवादी असले तरी शिक्षणातून माणूस म्हणून घडण्याची भूमिका बजावण्याच्या अनुषंगाने पाचव्या औद्योगिक युगाचा अभ्यास करणे.**

बदलते माहिती तंत्रज्ञान व औद्योगिकीकरण : पहिली औद्योगिक क्रांती 1765 मध्ये कोळशासाठी झाली.दुसरी औद्योगिक क्रांती 1870 मध्ये गॅसच्या संदर्भात झाली. तिसरी औद्योगिक क्रांती 1969 मध्ये इलेक्ट्रॉनिक आणि न्यूक्लिअर यासाठी झाली तर चौथी औद्योगिक क्रांती 2000 साली इंटरनेट आणि नवीकरणीय ऊर्जा यासाठी तर पाचवी औद्योगिक क्रांती 2018 मध्ये तंत्रज्ञान या बाबतीत झाली. जगामध्ये माहिती तंत्रज्ञान यांचा झपाट्याने विस्तार वाढत आहे. लोकल ते ग्लोबल असं जग जवळ आलेले आहे. एखादी माहिती सातव्या मिनिटाला जगभरात पोचते इतके तंत्रज्ञान पुढे गेले आहे.जाहिरातींवर औद्योगिकीकरणांनी टाकलेली झाप आधुनिक उत्पादन प्रक्रियेमध्ये अचूक समाधान देताना दिसत नाही. नैराश्याची नैराश्यता निर्माण होण्याकडे जगाचा तोल ढासळत चाललाय आणि हीच बाब शिक्षण क्षेत्रात होताना दिसत आहे. 'माध्यम हाच संदेश' असा सैद्धांतिक विचार माध्यम तज्ज्ञ मार्शल म्यॅकलूहान यांनी 'अंडरस्टँडिंग मीडिया' या पुस्तकात मांडलेला आहे. त्यामुळे अलीकडील काळात औद्योगीकरणाची पोच जाहिरातीच्या माध्यमातून माणूस नावाच्या ग्राहकावर लागली जात आहे. संदेश प्रभावीपणे पाठवण्यासाठी माध्यमांना विकसित करण्याकडे औद्योगिक धोरणांचा कल राहिलेला आहे. त्यामुळे मोबाईल स्मार्ट मोबाईल वापरण्याची संख्या विचारात घेता संदेशाचा वेग या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

सोशल मीडियातून वाढताना दिसतोय. केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सेक्रेटरी अपूर्वा चंद्र यांनी सांगितलं की भारतात 1.2 बिलियन लोक मोबाईल वापरतात तर 6.59 मिलियन स्मार्टफोन वापरतात. यातून एक गोष्ट लक्षात येते की स्मार्टफोन न वापरण्याची संख्या जास्त आहे त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाची एकमेव माध्यम मोबाईल हे गृहीत धरले तर शैक्षणिक प्रगतीतील संदेश योग्यरित्या त्या त्या घटकांपर्यंत पोहोचवता येईल का हा प्रश्न पुन्हा निर्माण होताना दिसतो.

पाचवी औद्योगिक क्रांती युगातील शिक्षण हे विद्यार्थ्यांना गंभीर विचार, सृजनशीलता, डिजिटल साक्षरता आणि समस्या सोडवणे,त्यांना भविष्यातील आव्हाने आणि संधीसाठी तयार करणे. यासारख्या कौशल्यासह सुसज्य करण्यावर लक्ष केंद्रित करते.पाचवी औद्योगिक क्रांती मानवी इतिहासातील एक परिवर्तनात्मक बिंदू आहे. तसेच टिकाऊपणा, मानव केंद्रितता आणि पर्यावरणाची काळजी यावरच लक्ष केंद्रित करते. पाचवी औद्योगिक युग हे लवचिकता, जबाबदारी, साधनसंपत्ती, तयारी आणि चिंतनशीलता या वेगवेगळ्या जीवन कौशल्याचे प्रतिनिधित्व करते. त्याची एक अपेक्षा आहे की ही जीवन कौशल्य विद्यार्थ्यांनी शाळेत असताना शिकावीत आणि आचरणात आणावीत. जेणेकरून शाळेबाहेर दैनंदिन जीवनात त्याचा उपयोग होईल म्हणजेच उद्योग 5.0 चा फायदा असा आहे की हे युग उत्पादन वेळ कमी करण्यास आणि उत्पादन प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करते आणि त्याचा तोटा असा आहे की, यामुळे मशीन द्वारे कामे केली जातात. मानवी कामगार कमी होतील आणि बेरोजगारी निर्माण होईल अशी भीती निर्माण होताना दिसते आहे तसेच पाचवे औद्योगिक युग भविष्य काळात एक खात्री देते की पूर्वी माणसे जे काम करत त्यासाठी यंत्राचा वापर करणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या जगण्याच्या आणि कार्य करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणेल. असा आशावाद निर्माण करते.या युगात भरभराट होण्यासाठी आपल्या मुलांना यशासाठी आवश्यक कौशल्ये सुसज्य करणे आवश्यक आहे.

औद्योगिक क्रांतीने समाजांना कृषी अर्थव्यवस्थेतून उत्पादन अर्थव्यवस्थेकडे वळवले जेथे उत्पादने केवळ हाताने बनवली जात नाहीत तर मशीनद्वारे बनवली जात होती. यामुळे उत्पादन आणि कार्यक्षमता वाढली, कमी किमती अधिक माल,सुधारित मजुरी आणि ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर झाले.

कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, नॅनो टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी आणि इंटरनेट ऑफ द थिंग्स यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या एकत्रित करणा द्वारे पाचव्या औद्योगिक क्रांतीच वैशिष्ट्य असेल. तंत्रज्ञानाच्या या अभिसरणामुळे 2035 पर्यंत 12 ट्रिलियनचे आर्थिक मूल्य निर्माण होण्याची अपेक्षा आहे. या परिवर्तनीय भविष्यासाठी तयार होण्यासाठी लोकांनी स्वतःला आवश्यक कौशल्याने सुसज्ज केले पाहिजे. जे त्यांना ऑटोमेशन आणि नाविन्यपूर्णतेमध्ये भरभराट होण्यासाठी सक्षम करतील.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

पाचव्या औद्योगिक क्रांतीमध्ये अपरिहार्य असणारी महत्त्वाची सात कौशल्य येथे दिलेली आहेत.

1) सृजनशीलता कल्पनेची शक्ती आत्मसात करा.

2) गंभीर विचार आणि समस्या सोडवणे.त्यासाठी माहितीपूर्ण निर्णयांना सक्षम बनवणे.

3) अनुकूलता यासाठी आजीवन शिक्षण स्वीकारा.

4) डिजिटल साक्षरता( मास्टरिंग टेक्नॉलॉजी)म्हणजेच तंत्रज्ञान केंद्रस्थानी असल्याने डिजिटल साक्षरतेला दिशा मिळेल.

5) भावनिक बुद्धिमत्ता: मानवी स्पर्श वापरणे.

6) लवचिकता: अडथळांमधून परत येणे आणि

7) क्रॉस सांस्कृतिक क्षमता : विविधता स्वीकारणे यातील अनुकूलता आजीवन शिक्षण स्वीकारा या अनुषंगाने आपण विचार करणार आहोत कर्मचाऱ्यांमध्ये झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे अनुकूलता आवश्यक असते पाचवी औद्योगिक क्रांतीमध्ये एक मात्र स्थिरता स्वतः बदलेल आमच्या मुलांनी आजीवन शिकणे सतत नवीन कौशल्या आत्मसात करणे आणि उद्योनमुख तंत्रज्ञानासह अद्यावत राहणे ही संकल्पना स्वीकारली पाहिजे. याचा अर्थ वाढीची मानसिकता वाढवणे ज्यामध्ये आव्हानांना वाढ आणि शिकण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे.परिस्थितीशी जुळून घेता येण्यामुळे व्यक्ती सतत विकसित होत असलेल्या लँडस्केप मध्ये संबंधित आणि लवचिक राहतील.

सक्षम शिक्षण देण्याची क्षमता तंत्रज्ञानामध्ये आहेत आज आपण ज्या गोष्टी तंत्रज्ञानाच्या साह्याने वापर करतो. ते आपल्याला काही दिवसापूर्वी ज्ञात सुद्धा नव्हत्या. कमी खर्च, चांगली पोहोच,मापन क्षमता, लवचिकता इत्यादी अनेक तंत्रज्ञान हे शिक्षणाचे महत्त्वाचे साधन ठरले आहे. कोविड 19 च्या आधी चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या दृष्टिकोनातून सायबर भौतिक प्रणालीच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित करते आणि ऑटोमेशन द्वारे मोठ्या प्रमाणावर चालते. याचा थेट परिणाम कौशल्याच्या गरजांवर होतो. आणि शिकणाऱ्याच्या मशीनची व्यवहार करण्यास सक्षम करणाऱ्या विविध कौशल्याने सुसज्य करणे हे आवश्यक आहे. तथापि चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या गरजेनुसार शिक्षण समायोजित करणे म्हणजे अधिष्ठांच्या मागे धावून अधिकाधिक तज्ञ पाचव्या औद्योगिक क्रांतीची कल्पना पुढे आणत आहेत आणि त्यानंतरच उत्पादन आणि सेवा प्रक्रिया सुचित करते असा याचा संदर्भ आहे. समीकरणातील मानवांच्या भूमिकेवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करणे आणि मानव आणि मशीन यांच्यातील प्रभावी आणि कार्यक्षम सहकार्य निश्चित करणे. शैक्षणिक परिवर्तनाचा दीर्घकालीन परिणाम व्हावा असे आपल्याला वाटत असेल तर आजच्या पाचव्या औद्योगिक क्रांतीच्या दृष्टिकोनातून आपण याकडे लक्ष दिले पाहिजे.

शिक्षणाची सुरुवात ही तंत्रज्ञानापासून नाही तर मानवापासून होते त्याचा मुख्य उद्देश हा विशिष्ट शिक्षणाच्या अनुभवाच्या परिणाम स्वरूप मानवाकडून प्राप्त करणे आवश्यक असलेल्या विशिष्ट परिणामांचा स्पष्टपणे संदर्भित करतो. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला लॅपटॉप किंवा त्या यासारख्या पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी सुधारण्याबद्दल डिजिटल साधना आणि प्लॅटफॉर्म विकसित करणे या ऐवजी बौद्धिक सामाजिक आणि भावनिक दृष्ट्या व्यक्तींना मजबूत करणे त्यांच्या आरोग्याच्या आणि वैयक्तिक विकासाची जाणीव ठेवणे सामान्य हेतू म्हणून सुरुवात करणे.त्यानंतर योग्य धोरणात्मक पद्धतशीर आणि अध्यापन शास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब केला पाहिजे. इतरांबरोबर प्रेरणा सृजनशीलता आणि शिकण्याचा आनंद विद्यार्थ्यांना परत आणण्याचा मार्ग समाविष्ट करतात. डिजिटल उपकरणे पायाभूत सुविधा आणि प्लॅटफॉर्म येथे महत्वपूर्ण असू शकतात तथापि ते सक्षम तयार करत नाही ते लक्षात घेतले पाहिजे.

**पाचवी औद्योगिक क्रांतीच्या दृष्टिकोनातून आपण आजच्या शिक्षणाकडे पाहिल्यास काही बाबी प्रकर्षाने पुढे येताना दिसतात.**

एक मानवी गुनांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी ठेवणे मानवाकडून उत्तम प्रकारे पार पडणारी कौशल्य आणि भूमिका ओळखणे आणि त्यांना विकशीत करणे.

दोन केवळ बाजारपेठेतील आणि कंपनीच्या गरजा ( रोजगारासाठी) नाहीतर सामाजिक गरजा ओळखता आल्या पाहिजेत.

तीन शिकणाऱ्या कडे एजंट म्हणून पाहणे तसा अभ्यासक्रम विकशित करणे आणि अंमलबजावणीमध्ये सक्रियपणे सहभागी होणे

चार शिक्षण घेणाऱ्यांना तंत्रज्ञानाबरोबर त्यांच्या परस्पर संवादाबद्दल आणि विशेषता घर, शाळा आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि कार्यात्मक चांगली शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्याची गरज आणि तंत्रज्ञान वापराचे परिणाम याबद्दलची जागरूकता शिकवली पाहिजे.

पाच विद्यार्थ्यांनी आयुष्यभर शिकले पाहिजे त्यासाठी त्यांच्या व्यावसायिक जीवनात सतत शिक्षणाची क्षमता विकशित करणे.

सहा विद्यार्थ्याला वैयक्तिक शिक्षण देण्यासाठी पारंपारिक शिक्षणाबरोबर अभ्यासक्रमांच्या उद्दिष्टांमध्ये स्वातंत्र आणि शिक्षणाचे परिमाण याबाबतीत सुनिश्चितता आणणे.

सात मुख्य उद्देश असा आहे की, विशिष्ट संस्थात्मक सहयोग पद्धतीच्या पलीकडे जाणाऱ्या आणि व्यक्ती आणि समुदायांना गुंतवून ठेवणाऱ्या पद्धतींचा प्रचार करणे आणि विशेषता सर्व प्रमुख भागधारक घटना गुंतवून ठेवणाऱ्या प्रभावी शिक्षण परिसंस्था तयार करणे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III

MAY – JUNE 2024

Original Research Article

पाचव्या औद्योगिक युगाच्या विशिष्ट उद्दिष्टांच्या सर्वोत्तम पूर्ततेसाठी शैक्षणिक वातावरण तयार करणे. त्यासाठी तंत्रज्ञान हे मुख्य साधन म्हणून वितरण यंत्रणेसाठी निवडले जाऊ शकते. या सर्व मुद्द्यांवरून एक गोष्ट लक्षात येते की, शैक्षणिक कार्यप्रणालीमध्ये तंत्रज्ञानाला केंद्रस्थानी ठेवलेले आहेत.मानवाला अभिप्रेत असणाऱ्या परिणामांच्या दृष्टिकोनातून परिवर्तनाकडे लक्ष दिले पाहिजे. शिक्षण आणि प्रशिक्षण देणाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्वे विकासित केली पाहिजेत. ती डिजिटल शिक्षणाने निर्माण होणारे परिणाम अभ्यासणे आवश्यक आहे. डेटा संरक्षण आणि गोपनियता आणि डिजिटल नैतिकता व इतर पैंलू वर शिक्षण देणाऱ्या व शिक्षण घेणाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्वे विकसित केली पाहिजेत. तसेच तंत्रज्ञानाच्या वापरात झपाट्याने वाढ होताना शाळांमध्ये आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यावर भर देणे गरजेचे आहे.

2) **शैक्षणिक शाश्वत विकास उद्दिष्टांच्या संस्थात्मिकीकरणासाठी फुले -शाहू -आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा सिद्धांतिक पाया महत्त्वाचा आहे या अनुषंगाने अभ्यास करणे**.

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये समाज सुधारकांनी शिक्षण हा घटक सामाजिक बदलासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो असं मत मांडलेले आहे. या दृष्टिकोनातूनच भारतीय शैक्षणिक वाटचालीत माणूस हा केंद्रबिंदू मानून समाज उन्नती हे ध्येय ठेवून व्यक्तिमत्व विकासाला महत्त्व देऊन राष्ट्रीय बांधणीच्या दुग्गोचारातून शैक्षणिक विचारांचा प्रचार आणि प्रसार झाल्याचे दिसून येते. याच अनुषंगाने शैक्षणिक प्रणालीमध्ये शाश्वत विकासाची उद्दिष्ट संस्थात्मकीकरणासाठी फुले- शाहू -आंबेडकर यांनी मांडल्याचे दिसून येते.

त्याचा सविस्तर आढावा आपण पुढील प्रमाणे घेऊयात..

**महात्मा ज्योतिराव फुले:**

सत्यशोधक समाजाची स्थापना करून सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणच महत्त्वाची भूमिका बजावू शकते ही खूणगाट बांधून स्वतःच्या पत्नीला शिक्षण देऊन सबंध भारतीय समाजाच्या शिक्षणाचा पाया रोवण्याचे महतम कार्य फुले दापत्यांनी केले.खरंतर त्यांनी शिक्षण प्रसार ही समाज सुधारण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल होते आणि तोच शैक्षणिक प्रणालीतील शाश्वत विकासाचा पाया आहे आणि हा शिक्षणाचा पाया औद्योगिकीकरणाचे धोरण ठिसूळ करत आहे.असेच म्हणावे लागेल. पाश्चिमात्य शैक्षणिक धोरण भारतीय देशी प्रांतात राबवण्याच्या हट्टा पायी इथला माणूस यांत्रिकीकरणाचा बटी होईल. त्याला तंत्रज्ञानच कारणीभूत ठरेल.विज्ञानवादी तंत्रज्ञानाचा दृष्टिकोन माणूस बनण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. मात्र कौशल्याच्या आधारित रोजगाराभिमुख शिक्षणाऱ्या नावाखाली उद्योगधंद्यासाठी निर्माण होणारे कारागीर व गुलाम बनता कामा नये. खरंतर हे पाचव्या औद्योगिक युगाचे गमक आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

**छत्रपती शाहू महाराज:** छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षण चळवळीचे प्रमुख सूत्र हे व्यापक समाजशिक्षण (मास एज्युकेशन) होते.शाहू महाराज नुसते शिक्षण सुरू करून थांबले नाहीत तर त्यांनी शिक्षणासाठी सोयी उपलब्ध करून दिल्या. सामाजिक सुधारण्यासाठी आरक्षणाची तरतूद करून सर्वंकष मुक्तीचा लढा त्यांनी दिला.

शिक्षण ही व्यक्ती विकास आणि समाज उध्दारांची यांची गंगोत्री आहे. या गंगोत्रीत आत्मावलोकन, आत्मबळ आणि आत्मप्रचिती आहे. त्याच्या अचूक अवलंबनाने माणसे नुसती शहाणी होत नाहीत तर ज्ञांनी होतात. ज्ञानीपन जीवनाच्या मूल सूत्रांचा वेध घेते.शहाणपण ज्ञानीपणाचा बाह्याचार असते.शाहू महाराजांना शिक्षणातून ज्ञानिपण अभिप्रेत होते. त्यासाठी आमचा समाज सुशिक्षित करणे व त्याची मने तयार करणे यासाठी रयतेमधील थोडासा भाग पुरुष सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे अशा मतप्रणालीने शाहू महाराजांनी सर्वांकष मुक्तीचा लढा उभारला.

शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झालेली नाही. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्धी व लढवे वीर कधीही विपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षणा नेच अमुचा तरुणोपाय आहे.असे ठाम मत छत्रपती शाहू महाराजांचे होते.

शिक्षण विषय गुंतवणूक ही मानवी भवितव्याच्या दृष्टीची गुंतवणूक आहे छत्रपती च्या मनाशी असलेले घट्ट गणित होते.शिक्षण म्हणजे काय हे माहीत नसलेल्या सर्वसाधारण समाजाच्या मनामध्ये शिक्षणासंबंधी आस्था रुजवून शिक्षणासंबंधी अभिरुची निर्माण करणे आणि शिक्षण ही अवघ्या परिवर्तनाची गंगोत्री आहे. याचे भान मिळवणे हे महत्त्वाचे होते.शाहू महाराजांनी ते दिले केवळ शिक्षण देऊन माणसांना सुशिक्षित करण्याबरोबर अज्ञान,अंधश्रद्धा व दारिद्र्य यांनी ग्रस्त झालेल्या सर्वसामान्य माणसांच्या परिवर्तनाची- मुक्तीची चळवळ होती. त्या अर्थाने शाहू महाराजांनी भावी पिढ्यांसाठी शिक्षणाचे अकोलाच झाड लावीत होते. असे म्हणायला हरकत नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** व्यक्तीचे अथवा समाजाचे मागासलेपण हे त्यांच्या शिक्षणाच्या अभावामुळे असते.समाजाच्या तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचले.तरच देशाची सर्वांगीण प्रगती होऊ शकते.अशी त्यांची धारणा होती. समाजाने बहिष्कृत केलेल्या जाती जमातींना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करून त्यांचे सबलीकरण झाले पाहिजे. या मताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते.

शिक्षण स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे असे सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात, हिंदू समाजाच्या अगदी खालच्या स्तरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते.पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III

MAY – JUNE 2024

Original Research Article

निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यांच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे. चालू समाज पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसारा खेरीज दुसरा कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे.डॉ. आंबेडकरांच्या या उद्धारातून त्यांचे शिक्षण विषयक सूत्र स्पष्ट होते.

शैक्षणिक सवलतीच्या धोरणाबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, दोन माणसे सुदृढ असतील तर एखाद्याला मलिदा व दुसऱ्याला कोंडा त्यांना केव्हाच रास्त होणार नाही पण एक रोगी व दुसरा निरोगी असला तर निरोगी याला कोंडा व रोग्याला मलिदा हीच व्यवस्था प्रशस्त ठरेल. असामानांना समान पातळीवर आणावयाचे असेल तर असमानांना विशेष सवलती दिल्या पाहिजे ही डॉ. आंबेडकरांची भूमिका होती.

**निष्कर्ष:**

सामाजिक बदलाचे आणि समाज परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते.म्हणून मानवी जीवनात व राष्ट्रीय विकासात शिक्षण हे सर्वात जास्त महत्त्वाचे आहे. त्याला धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि संस्कृतीक तसेच औद्योगिक जोड देऊन चालणार नाही. कारण भारतीय समाज व्यवस्था आज ही नव्या रूपाने विषम अवस्थेत कार्यरत असताना दिसत आहे. आज आपण भारतीय राज्यघटनेने दिलेला शिक्षणाचा मूलभूत अधिकार किती प्रमाणात रुजू शकलो हा खरा प्रश्न आहे. प्राथमिक शिक्षण आणि सक्तीचे शिक्षण मोफत देण्याकडे आपला आजही सकारात्मक दृष्टिकोन व सर्वांगीण इच्छा होताना दिसत नाही.आजची शिक्षण प्रणाली बदलत्या माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेऊन औद्योगिकीकरणाच्या युगाला लटकावून ठेवत आहे.हे भविष्याच्या दृष्टिकोनातून सर्वांगीण गंभीर बाब असणार आहे. मास एज्युकेशन पासून क्लास एज्युकेशन पर्यंतचा प्रवास हा अनेक घटकांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचाच भाग आहे असे म्हणावे लागेल.

व्यक्ती विकासासाठी आणि राष्ट्रीय विकासासाठी शिक्षण हा घटक महत्त्वाचा मानून माणसाला माणूस म्हणून समाज व्यवस्था बदलासाठी 'माणूस' म्हणून तयार करणे. हे आजच्या शिक्षण व्यवस्थेचे महत्तम उद्दिष्ट असले पाहिजे. विद्यार्थ्याला रोजगाराभिमुख बनवण्याच्या नावाखाली कौशल्य आधारित शिक्षण देऊन त्याला यांत्रिक बनवण्यापेक्षा फुले- शाहू - आंबेडकर या समाजसुधारकांनी घालून दिलेल्या शैक्षणिक पाया या आधारावरच आपण वाटचाल केल्यास शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचे संस्थात्मिकीकरण होईल.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE–III MAY – JUNE 2024

Original Research Article

**संदर्भ:**

१. डॉ.भोसले एस. एस. क्रांतीसूत्रे राजश्री छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, सुधारित आवृत्ती नोव्हेंबर 1991

२. डॉ.भारती पाटील (संपादन), आम्ही सावित्रीच्या लेकी, श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर

३. मडकुळे आर.पी., युगस्त्री सावित्रीबाई फुले, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती 11 ऑगस्ट 1982

४. डॉ. भोसले एस.एस., राजश्री शाहू संदर्भ आणि भूमिका, रणजीत बुक स्टॉल कोल्हापूर, प्रथम आवृत्ती 1981

५. डॉ. रानडे गो.मो., महात्मा ज्योतिराव फुले, मंगल प्रकाशन नागपूर, व्दितीय आवृत्ती 1991

६. कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण 2015

७. बागल भाई माधवराव, आजही आपले मार्गदर्शक महात्मा फुलेच, लोकसेवा समिती प्रकाशन कोल्हापूर, पुनर्मुद्रण, 14 मार्च 1989

८. डॉ. माळी मा.गो., हा धन्य ज्योतिबा झाला, आशा प्रकाशन गारगोटी,

९. पाटील अजित, माणसातील देव, मॅकमिलन पुणे पुनर्मुद्रण 2010

१०. कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर, तिसरी आवृत्ती जून 2011

११. वेबसाईट: पाचवे औद्योगिक युग

१२. मार्शल म्यॅकलूहन : अंडर स्टँडिंग मीडिया

*Cite This Article:*

***डॉ. रणदिवे नि. व प्रा. लोखंडे वि. वि.*** **(2024).** *पाचव्या औद्योगिक युगाच्या परिप्रेक्ष्यात शैक्षणिक शाश्वत विकास उद्दिष्टांच्या संस्थात्मकीकरण्याची भूमिका.* In Educreator Research Journal: Vol. XI (Issue III), pp. 142–150.

**ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.12935175